# राज्यसेवा मुख्य परीक्षा

## घटकनिहाय

## प्रश्नपत्रिका विश्लेषण

## २०१२–२०१८

## GS : पेपर : २

PRITHVI®
Publication

**राज्यसेवा मुख्य परीक्षा**

**घटकनिहाय प्रश्नपत्रिका विश्लेषण**

**२०१२–२०१८**

**GS : पेपर : २**

**© पृथ्वी पब्लिकेशन**

**आवृत्ती**

एप्रिल २०१९

**प्रकाशक**

'पृथ्वी पब्लिकेशन', १५३६

सदाशिव पेठ, पुणे– ४११०३०.

फोन : ०२० – २४४५१९८६

**मुखपृष्ठ मांडणी**

नंदकिशोर धपाटे

**मांडणी**

रूपाली तांबे

अपूर्वा शिंदे

कोमल शेडगे

**मुद्रितशोधन**

प्रज्ञा सुधाकर भोसले

**वितरण व्यवस्था**

मो. नं. : ८३९०५५४१६१

**अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क**

मो. नं. : ८३९०५५४१६१

publication@prithvi.net.in

**मूल्य : ₹ २७०/–**

PRITHVI® Publication

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | **भारताचे संविधान** : संविधानाची निर्मिती प्रक्रिया, संविधानाची ठळक वैशिष्ट्ये, उद्देशिकेतील तत्त्वज्ञान (धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि समाजवादी), मूलभूत अधिकार व कर्तव्ये, राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, सामायिक नागरी संहिता आणि मूलभूत कर्तव्ये, केंद्र राज्य संबंध आणि नवीन राज्यांची निर्मिती, स्वतंत्र न्याय व्यवस्था सुधारणेची प्रक्रिया आणि संविधानातील प्रमुख सुधारणाः संविधानाचा अर्थ लावताना वापरण्यात आलेले ऐतिहासिक न्यायनिर्णय, प्रमुख आयोग आणि मंडळांची रचना आणि कार्येः निवडणूक आयोग, संघराज्य आणि राज्य लोकसेवा आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक अनुसूचीत जाती/अनुसूचीत जमाती आयोग. नदी पाणी विवाद निवारण मंडळ, इ. | ९ |
| २. | **राजकीय यंत्रणा (शासनाची रचना, अधिकार व कार्य)** : भारतीय संघराज्याचे स्वरूप – संघराज्य व राज्य – विधीमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याययंत्रणा, केंद्र – राज्य संबंध – प्रशासकीय, कार्यकारी व वित्तीय संबंध वैधानिक अधिकार, विषयांचे वाटप<br>**(१) केंद्र सरकार** : केंद्रीय कार्यकारी मंडळ, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रीमंडळ – भारताचा महाअधिवक्ता – भारताचा नियंत्रक आणि महालेखा परीक्षक<br>**(२) केंद्रीय विधीमंडळ** : संसद, सभापती व उपसभापती, संसदीय समित्या, कार्यकारी मंडळावरील संसदेचे नियंत्रण<br>**(३) न्यायमंडळ** : न्यायमंडळाची रचना, एकात्मिक न्यायमंडळ – कार्य, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये – लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका. | ६८ |
| ३. | **राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भासह)** : महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि पुनर्रचना, राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ, मुख्य सचिव, राज्य सचिवालय, संचलनालये, विधानसभा, विधानपरिषद – अधिकार, कार्य व भूमिका – विधीमंडळ समित्या, मुंबईचा नगरपाल (शेरीफ). | १०६ |
| ४. | **जिल्हा प्रशासन** : जिल्हा प्रशासनाचा विकास, जिल्हा दंडाधिकाऱ्याची बदलती भूमिकाः कायदा व सुव्यवस्था, कार्यकारी विभागांबरोबरचे संबंध – जिल्हा प्रशासन व पंचायतराज संस्था, उपविभागीय अधिकाऱ्याची भूमिका आणि कार्य. | १३४ |

| | |
|---|---|
| ५. **ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन** : ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व, स्थानिक प्रशासनाचे सबलीकरण व विकासातील त्यांची भूमिका.<br>(१) **ग्रामीण स्थानिक शासन** : जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्राम पंचायतीची रचना, अधिकार व कार्य, महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थेची खास वैशिष्ट्ये पंचायतराज संस्थांच्या स्थितीचा अहवाल व त्यांच्या कामगिरीचे मूल्यन, ७३ व्या घटनादुरुस्तीची महत्त्वाची वैशिष्ट्ये, अंमलबजावणीतील अडचणी, प्रमुख ग्रामीण विकास कार्यक्रम आणि त्यांचे व्यवस्थापन.<br>(२) **नागरी स्थानिक शासन** : महानगरपालिका, नगरपरिषद आणि कटक मंडळाची रचना व कार्य. रचना, अधिकारी, साधन संपत्ती, अधिकार कार्य आणि नियंत्रण ७४ व्या घटनादुरुस्तीची महत्त्वाची वैशिष्ट्येः अंमलबजावणीतील समस्या, प्रमुख नागरी विकास कार्यक्रम व त्यांचे व्यवस्थापन. | १४१ |
| ६. **शिक्षण पद्धती** : राज्य धोरण व शिक्षण याविषयीची निर्देशक तत्त्वेः वंचित घटक – अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लीम व महिला यांचे शिक्षणविषयक प्रश्न ; शिक्षणाचे खासगीकरण – शिक्षणाच्या प्रांतात प्रवेश, गुणवत्ता, दर्जा सामाजिक न्याय यासंबंधीचे मुद्दे ; सेवांतर्गत व्यवसायासंबंधात सामान्य करार आणि नवीन उद्‌भवणारे मुद्देः उच्च शिक्षणातील आजची आव्हाने, सर्व शिक्षा अभियान, माध्यमिक शिक्षा अभियान. | १७६ |
| ७. **पक्ष आणि दबाव गट** : पक्ष पद्धतीचे स्वरूप – राष्ट्रीय पक्षांची भूमिका– विचारप्रणाली, संघटन व निवडणुकीतील कामगिरी – राजकीय पक्ष व त्यांचे सामाजिक अधिष्ठान. प्रादेशिकतावाद – प्रादेशिक पक्षांचा उदय – विचारप्रणाली, संघटन व निवडणुकीतील कामगिरी ; महाराष्ट्रातील प्रमुख दबाव गट व हितसंबंधित गट – त्यांची भूमिका व धोरण निर्धारणावर त्यांचा होणारा परिणाम, महाराष्ट्रातील समाज कल्याण कार्यक्रम ; महिला व बालक ; कामगार व युवक, अशासकीय संघटना व समाज कल्याणामधील त्यांची भूमिका. | २०१ |
| ८. **प्रसारमाध्यमे** : मुद्रण व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे – धोरण निर्धारणावर त्यांचा होणारा परिणाम, जनमत तयार करणे व लोकजागृती करणे ; भारतीय वृत्तपत्र परिषद (प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया) ; भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीमधील जनसंपर्क प्रसारमाध्यमांसाठी आचारसहिता ; मुख्य प्रवाहातील जनसंपर्क प्रसारमाध्यमांमधील महिलांचा सहभाग ; वस्तुस्थिती व मानके ; भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि त्यावरील मर्यादा. | २२० |
| ९. **निवडणूक प्रक्रिया** : निवडणूक प्रक्रियेची ठळक वैशिष्ट्ये – एक सदस्यीय प्रादेशिक मतदारसंघ, दुर्बल घटकांकरिता राखीव मतदारसंघ, प्रौढ मताधिकार – निवडणूक आयोगाची भूमिका – सार्वत्रिक निवडणुका – प्रमुख कल – मतदान वर्तनाचे स्वरूप आणि मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक– खुल्या व निःपक्ष वातावरणात निवडणुका घेण्यामधील समस्या व अडचणी – निवडणूकविषयक सुधारणा – इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे. | २२८ |

| | |
|---|---|
| १०. **प्रशासनिक कायदा :** कायद्याचे राज्य, प्रशासकीय स्वेच्छानिर्णय आणि त्याचे नियंत्रण व न्यायिक आढावा. प्रशासनिक न्यायाधिकरणे, त्यांची स्थापना व कार्यशीलता, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे. | २५२ |
| ११. **केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे विशेषाधिकार :** भारतीय साक्षीपुरावा अधिनियमाचे कलम १२३, शासकीय गुपिते अधिनियम, माहितीचा अधिकार आणि शासकीय गुपिते अधिनियमावर त्याचा होणारा परिणाम | २६१ |
| १२. **काही सुसंबद्ध कायदे :**<br>(१) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ : उद्दिष्टे, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना<br>(२) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ : व्याख्या – ग्राहक विवाद – निवारण यंत्रणा.<br>(३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ : अपीलकर्त्यांचे अधिकार, सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य, माहिती मधील अपवाद.<br>(४) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (सायबरविषयक कायदा): व्याख्या. प्राधिकरणे अपराध<br>(५) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम : उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.<br>(६) अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ : उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.<br>(७) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) नियम १९९५ : उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.<br>(८) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ : उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना. | २६६ |
| १३. **समाज कल्याण व सामाजिक विधिविधान :** सामाजिक बदलाचे साधन म्हणून सामाजिक विधिविधानः मानवी हक्क; भारताचे संविधान व फौजदारी कायदा (फौजदारी प्रक्रिया संहिता), घरगुती हिंसाचार (प्रतिबंध) अधिनियम, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत महिलांना संरक्षण. | ३०४ |
| १४. **सार्वजनिक सेवा :** अखिल भारतीय सेवा, सांविधानिक दर्जा, भूमिका व कार्येः केंद्रीय सेवा : स्वरूप व कार्यः केंद्रीय लोकसेवा आयोग; राज्य सेवा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग; शासन व्यवहाराच्या बदलत्या संदर्भात प्रशिक्षण – यशदा, लाल बहादूर शास्त्री प्रशासन अकादमी, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी. | ३१४ |
| १५. **सरकारी खर्चावर नियंत्रण :** संसदीय नियंत्रण, अंदाज समिती, लोकलेखा समिती, सार्वजनिक उपक्रमांवरील समिती, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांचे कार्यालय, पैसाविषयक व राजकोषीय धोरणामधील वित्त मंत्रालयाची भूमिका, महालेखापाल, महाराष्ट्र यांची रचना व कार्य | ३३५ |
| १६. चालू घडामोडी व इंडिया इयर बुक | ३५८ |

## विश्लेषण तक्ता
### विचारलेल्या प्रश्नांची संख्या

| अभ्यासक्रम | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| १ | २४ | २३ | १८ | २४ | २४ | २३ | ३० |
| २ | १२ | २१ | १७ | १४ | २० | १६ | ८ |
| ३ | २२ | ८ | ११ | ६ | ९ | १२ | ११ |
| ४ | १ | २ | – | ६ | ३ | ४ | ४ |
| ५ | १३ | १३ | १८ | १२ | १६ | १३ | १५ |
| ६ | १० | ८ | ९ | १२ | ९ | ११ | ७ |
| ७ | ५ | ७ | ७ | ७ | ८ | १२ | १२ |
| ८ | २ | २ | ९ | ३ | ४ | ४ | २ |
| ९ | ११ | १३ | १९ | १४ | ४ | ९ | ९ |
| १० | ६ | ४ | ५ | ६ | ६ | ४ | ६ |
| ११ | १ | ३ | २ | १ | ४ | १ | ३ |
| १२ | २० | १६ | ११ | १७ | १९ | १५ | १५ |
| १३ | – | २ | ३ | ४ | ५ | ९ | ८ |
| १४ | १० | ६ | ११ | १० | १३ | १० | ६ |
| १५ | १३ | ६ | ११ | १२ | ७ | ९ | ११ |
| १६ | – | १५ | – | – | – | – | २ |

# सामान्य अध्ययन- २

## भारतीय संविधान व भारतीय राजकारण (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) व कायदा

**: अभ्यासक्रम :**

१. **भारताचे संविधान** : संविधानाची निर्मिती प्रक्रिया, संविधानाची ठळक वैशिष्ट्ये, उद्देशिकेतील तत्त्वज्ञान (धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि समाजवादी), मूलभूत अधिकार व कर्तव्ये, राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, सामायिक नागरी संहिता आणि मूलभूत कर्तव्ये, केंद्र राज्य संबंध आणि नवीन राज्यांची निर्मिती, स्वतंत्र न्याय व्यवस्था सुधारणेची प्रक्रिया आणि संविधानातील प्रमुख सुधारणाः संविधानाचा अर्थ लावताना वापरण्यात आलेले ऐतिहासिक न्यायनिर्णय, प्रमुख आयोग आणि मंडळांची रचना आणि कार्येः निवडणूक आयोग, संघराज्य आणि राज्य लोकसेवा आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमाती आयोग. नदी पाणी विवाद निवारण मंडळ, इ.

## २०१२

१. **घटनेच्या १९(१)(अ) व्या कलमामधे मान्य केलेल्या नागरिकांच्या अधिकारावर खालील कारणांमुळे वाजवी बंधने येऊ शकतात :**

**अ) देशाचे सार्वभौमत्व** **ब) देशाची एकता**

**क)प्रांताची सुरक्षितता** **ड) सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी**

**योग्य पर्याय निवडा :**

१) अ आणि क २) ब आणि ड ३)अ आणि ब ४)फक्त ड

**उत्तर :३ – अ आणि ब**

**स्पष्टीकरण** – लोकशाही देशांमधील व्यक्तींना काही मूलभूत हक्क प्रदान केले जातात, ज्यांचे संरक्षण देशातील न्यायव्यवस्थेमार्फत केले जाते. राज्यघटनेतील कलम १९ (१) अन्वये, सर्व नागरिकांना ६ स्वातंत्र्याचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत. या ६ स्वातंत्र्याच्या हक्कांना केवळ राज्यसंस्थेच्या कृतीविरुद्ध संरक्षण प्राप्त आहे, खाजगी व्यक्तींविरुद्ध नाही. कलम १९ (१) (अ) नागरिकांना भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल करते. मात्र राज्यसंस्था नागरिकांच्या या स्वातंत्र्यावर पुढील आधारावर पर्याप्त मर्यादा घालू शकतात: भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, देशाची सुरक्षा, परदेशी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नैतिकता, न्यायालयाचा अवमान इ.

२. **खालीलपैकी कोणते विषय घटनेच्या समवर्ती सूचीत अंतर्भूत आहेत ?**

**अ) शिक्षण** **ब) व्यवसाय कर** **क) वजन माप मानके (प्रमाण)**

**ड) वीज** **इ) वने**

**योग्य पर्याय निवडा :**

१)अ, ड, इ २) अ, ब, क ३) सर्व ४)एकही नाही.

**उत्तर : १ – अ, ड आणि इ**

**स्पष्टीकरण –** ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे शिक्षण, वने, वन्यप्राणी व पक्षी संरक्षण, वजन व मापे, न्यायाचे प्रशासन (सर्वोच्च व उच्च न्यायालय वगळून) हे ५ विषय राज्यसूचीतून समवर्ती सूचित टाकण्यात आले. वजन माप मानके (प्रमाण) हा विषय केंद्रसूचीत आहे तर व्यवसाय कर हा विषय राज्यसूचीत समाविष्ट करण्यात आला आहे.

**प्रश्न क्र. ३ ते ७ मध्ये दोन वाक्ये दिली आहेत. त्यापैकी पहिले प्रतिपादन (A) म्हटले आहे आणि दुसरे कारण (R) म्हटले आहे. दोन्ही वाक्यांचे परीक्षण करा आणि खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा.**

१) दोन्ही, A आणि R बरोबर आहेत आणि R हे A चे बरोबर स्पष्टीकरण आहे.

२) A आणि R बरोबर आहेत, परंतु R हे A चे बरोबर स्पष्टीकरण नाही.

३) A बरोबर आहे, R बरोबर नाही.

४) A बरोबर नाही, R बरोबर आहे.

३. प्रतिपादन (A) : नियोजन आयोग ही घटनात्मक संस्था नाही आणि वैधानिक संस्थाही नाही.

कारण (R) : केंद्रीय कॅबिनेट च्या कार्यकारी ठरावानुसार नियोजन आयोगाची स्थापना झाली आहे.

**उत्तर :१ – दोन्ही A आणि R बरोबर आहेत आणि R हे चे बरोबर स्पष्टीकरण आहे.**

**स्पष्टीकरण –** एक सल्लागार संस्था म्हणून १५ मार्च १९५0 रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार नियोजन आयोग उदयास आला. १३ ऑगस्ट २०१४ रोजी मोदी सरकारने नियोजन आयोग बरखास्त केला आणि १ जानेवारी २०१५ पासून नीती आयोग (National Institution for Transforming India) कार्यान्वित केला.

४. प्रतिपादन (A) : केशवानंद भारती वि. केरळ राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे जाहीर केले की घटनेच्या मूलभूत संरचनेत दुरुस्ती करता येणार नाही.

कारण (R) : सर्वोच्च न्यायालयाने, संसदीय सार्वभौमत्व आणि न्यायालयीन पुनर्विलोकन यामधे संतुलन आणले.

**उत्तर : १ – दोन्ही, A आणि R बरोबर आहेत आणि R हे A चे बरोबर स्पष्टीकरण आहे.**

**स्पष्टीकरण –** केशवानंद भारती खटल्यात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने २४ व्या घटनादुरुस्तीची (१९७१) वैधता मान्य करून संसदेस कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून टाकण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले. मात्र, त्याचबरोबर घटनेची मूलभूत संरचना या नवीन तत्त्वाची मांडणी केली. त्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय केला, कलम ३६८ अंतर्गत संसदेला घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करण्याचा अधिकार प्राप्त नाही.

५. प्रतिपादन (A) : मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी न झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येत नाही

कारण (R) : देशाच्या शासनकारभारात मार्गदर्शक तत्त्वे ही मूलभूत आहेत

**उत्तर :२ – A आणि R बरोबर आहेत परंतु R हे A चे स्पष्टीकरण नाही.**

**स्पष्टीकरण:** व्यक्तीचे कल्याण व देशाची प्रगती होण्यासाठी सरकारने कल्याणकारी योजना व धोरणे आखणे गरजेचे असते. त्यासाठीच घटनाकर्त्यांनी 'राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा' समावेश घटनेमध्ये केला. भाग ४ (कलम ३६ ते ५१) मध्ये ही तत्त्वे देण्यात आली आहेत. देशात सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यांच्यामार्फत केला जात असेल तरी ती न्यायप्रविष्ट नाहीत.

**११. खालीलपैकी कोणत्या बाबी राज्याच्या महसुलाचा भाग नाहीत ?**

**अ) जमीन महसूल** **ब) मालमत्ता कर** **क) आय कर** **ड) मनोरंजन कर**

१) ब, क, ड २) ब, आणि क ३) अ आणि ब ४)अ, क, ड आणि इ

**(हा प्रश्न रद्द करण्यात आला.)**

**१४. कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे राष्ट्रपतींना मंत्रीपरिषदेच्या सल्ल्यानुसार वागणे बंधनकारक आहे ?**

१) ४२ वी घटनादुरुस्ती २) ४४ वी घटनादुरुस्ती ३) २४ वी घटनादुरुस्ती ४) ५२ वी घटनादुरुस्ती

**उत्तर :१ – ४२ वी घटनादुरुस्ती**

**स्पष्टीकरण –** राज्यघटनेतील कलम ७४ (१) नुसार राष्ट्रपतीस साहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखालील एक मंत्रीमंडळ असेल आणि राष्ट्रपती आपली कार्ये पार पाडताना त्या सल्ल्यानुसार वागतील. हे कलम ४२ व्या घटनादुरुस्ती द्वारे समाविष्ट करण्यात आले.

**१६. भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका ही ............ आहे.**

**अ) राज्यघटनेचे हृदय ब) राज्यघटनेचा आत्मा क) राज्यघटनेचे डोके ड) यापैकी नाही.**

**योग्य पर्याय निवडा :**

१) अ आणि क २) ब आणि क ३) फक्त ब ४) फक्त ड

**उत्तर :३ – फक्त ब**

**स्पष्टीकरण –** भारताच्या घटनेची उद्देशपत्रिका पंडित नेहरू यांनी तयार केलेल्या व संविधान सभेत मांडलेल्या 'उद्देश पत्र' (Objective Resolution) वर आधारित आहे. संविधान सभेचे सदस्य पंडित ठाकूर दास भार्गव यांच्या मते उद्देशपत्रिका आपल्या घटनेतील सर्वात मौल्यवान भाग आहे, ती घटनेचा आत्मा आहे, ती घटनेची चावी आहे.

**१७. 'मार्गदर्शक तत्त्वे कोऱ्या चेकप्रमाणे आहेत ज्यांचे वटविणे बँकेच्या इच्छेवर सोडलेले आहे' असे कोणी म्हटले आहे ?**

१) डॉ. बी. आर. आंबेडकर २) प्रो. के. टी. शाह ३) एन. जी. रंगा ४) बी. एन. राव

**उत्तर :२ – प्रो. के. टी. शाह**

**स्पष्टीकरण –** मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायप्रविष्ट नसल्याने त्याच्यावर विविध प्रकारे टीका करण्यात आली. प्रो. के. टी. शाह यांनी वरील विधानातून त्यांच्यावर टीका केली तर काहींनी त्यांना नववर्षाचा निश्चय, भावनांची खरी केराची टोपली अशा उपमा देऊन त्यांच्यावर टीका केली.

**१८. भारतीय राज्यघटनेत नमूद मूलभूत कर्तव्यामध्ये नमूद आशय अंतर्भूत असली तरी खालील विधानांमधील काही शब्द विशेषत्वाने नमूद नाहीत ते जादाचे नमूद केले आहेत आहेत अशी खालीलपैकी कोणती विधाने आहेत ?**

**अ) राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व देशातील कायद्याचा आदर करणे.**

**ब) स्त्रियांच्या व बालकांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.**

**क) सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे रक्षण करणे.**

**ड) आठव्या वर्गापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करणे.**

**योग्य पर्याय निवडा :**

१) अ, क २) ब ३) ड ४) सर्व

**उत्तर :४ – सर्व**

**स्पष्टीकरण –** समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीला जसे हक्क प्राप्त होतात त्याचप्रमाणे त्या व्यक्तीने समाजासाठी काही जबाबदाऱ्या पार पाडणेही अपेक्षित असते. राज्यघटनेच्या कलम ५१ (अ) मध्ये ४२ व्या घटनादुरुस्ती अन्वये नागरिकांची मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. त्यापैकी काही नैतिक कर्तव्ये आहेत तर काही नागरी. मात्र त्यातील काही संकल्पना अस्पष्ट आहेत. यामुळे काही शब्दांचा विशेषत्वाने उल्लेख करून मूलभूत कर्तव्यांना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**२२. भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका प्रथमत: केव्हा दुरुस्त करण्यात आली ?**

१) १९५२ २) १९६६ ३) १९७६ ४) १९८६

**उत्तर :३ – १९७६**

**स्पष्टीकरण –** १९७६ मध्ये प्रथमच आणि आत्तापर्यंत एकदाच उद्देशपत्रिका दुरुस्ती करण्यात आली. ४२ वी घटनादुरुस्ती, १९७६ द्वारे उद्देशपत्रिकेतील समाजवादी, धर्मनिरपेक्षता व एकात्मता हे शब्द नव्याने टाकण्यात आले.

**२४. भारतीय संविधानाने नागरिकांना आर्थिक न्यायाची खात्री कशाद्वारे दिली ?**

१) उद्देशपत्रिका २) मूलभूत अधिकार

३) मूलभूत कर्तव्य ४) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

**उत्तर : १ – उद्देशपत्रिका**

**स्पष्टीकरण –** उद्देशपत्रिकेमध्ये न्यायाची ३ स्पष्ट स्वरूपे स्वीकारण्यात आली आहेत. सामाजिक, आर्थिक व राजकीय. या तिन्ही प्रकारचा न्याय साध्य करण्याचा प्रयत्न मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांच्या तरतुदींच्या साहाय्याने करण्यात आला आहे.

**२६. भारतीय संविधानाच्या १९(१) व्या कलमात खालीलपैकी कोणत्या स्वातंत्र्याचा विशेषत्वाने समावेश नाही ?**

१) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य २) मुद्रण स्वातंत्र्य

३) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार स्वातंत्र्य ४) बिनाशस्त्र व शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य

**उत्तर :२ – मुद्रण स्वातंत्र्य**

**स्पष्टीकरण –** राज्यघटनेतील कलम १९ (१) अन्वये, सर्व नागरिकांना पुढील ६ स्वातंत्र्याचे हक्क प्रदान करण्यात आलेत आहेत.

अ) भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आ) शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य

इ) संघटनेचे स्वातंत्र्य ई) मुक्त संचाराचे स्वातंत्र्य

उ) वास्तव्याचे स्वातंत्र्य ऊ) व्यवसायाचे स्वातंत्र्य

**२९. आंतरराज्यीय नद्या व नद्या खोरे विवादांबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?**

१) संसद कायदा करून आंतरराज्यीय नदी अथवा नदी खो–यामधील पाणी वापर, वाटप अथवा नियंत्राबाबत त र तू द करु शकते.

२) संसद कायदा करून अशा आंतरराज्यीय जलविवादाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार बंदीत करु शकत नाही.

३) संसद कायद्याद्वारे उच्च न्यायालयाचे अथवा इतर कनिष्ठ न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातून हा विषय वगळण्याची तरतूद करू शकते.

४) महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश यामधील कृष्णा पाणीवाटप लवाद तंटा हा राज्य घटनेच्या कलम २६२ च्या तरतुदीनुसार जाहीर
करण्यात आला आहे.

**उत्तर : २ – संसद कायदा करून अशा आंतरराज्यीय जलविवादाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार बंदीत करू शकत नाही.**

**स्पष्टीकरण –** अनेक मोठ्या नद्या एकापेक्षा अधिक राज्यांमधून वाहत असल्याने त्यांच्या पाण्याच्या वापराबद्दल विवाद निर्माण होतात. असे आंतरराज्यीय जलविवाद सोडवण्यासाठी घटनेच्या कलम २६२ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. संसदेत कायद्याद्वारे आंतरराज्यीय नदीच्या किंवा नदीखोऱ्यातील पाण्याचा वापर, वाटप किंवा नियंत्रण